# PSI-STI-ASO - मुख्य परीक्षा - 2021
## पेपर 1
## मराठी, इंग्रजी व सामान्य ज्ञान

**1. 'तो म्हणे वेडा झाला.' या वाक्यातील अधोरेखित केवलप्रयोगी शब्दाचा उपप्रकार ओळखा.**
(1) आश्चर्यदर्शक (2) पादपूरणार्थ
(3) शोकदर्शक (4) तिरस्कारद्योतक

**2. सकाळी मी मित्राबरोबर फिरावयास जातो किंवा क्रीडांगणावर खेळतो. या वाक्याचा प्रकार ओळखा.**
(1) केवल वाक्य (2) मिश्र वाक्य
(3) संयुक्त वाक्य (4) यापैकी नाही

**3. पुढील विधाने पहा.**
(अ) मराठीमध्ये एकूण नऊ सर्वनामे आहेत.
(ब) तीन सर्वनामे वचनानुसार बदलतात.
(क) पाच सर्वनामे लिंगानुसार बदलतात.
**वरीलपैकी अयोग्य विधाने असणारा पर्याय निवडा :**
(1) फक्त (अ), (ब) (3) फक्त (अ), (क)
(2) फक्त (ब), (क) (4) (अ), (ब), (क) सर्व

**4. 'शिपायाकडून चोर पकडला जातो' या वाक्यातील प्रयोगरचनेचा प्रकार ओळखा.**
(1) पुराण कर्मणी (2) शक्य कर्मणी
(3) नवीन कर्मणी (4) कर्तव्य कर्मणी

**5. (अ) त्याने हात वर केला.**
**(ब) तो हसत बोलला.**
**वरील वाक्यातील अधोरेखित क्रियाविशेषणांचा प्रकार ओळखा.**
(1) साधित क्रियाविशेषणे
(2) आवृत्तीवाचक क्रियाविशेषणे
(3) स्थानिक क्रियाविशेषणे
(4) रीतिवाचक क्रियाविशेषणे

**6. योग्य जोड्या जुळवा.**
(a) स्वरसंधी (i) सन्मती, उन्माद
(b) व्यंजनसंधी (ii) निश्चित, पुरस्कार
(c) अनुनासिकसंधी (iii) धारोष्ण, खाणावळ
(d) विसर्गसंधी (iv) विद्युल्लता, जगज्जीवन
**पर्यायी उत्तरे :**
(1) (a)-(iii), (b)-(iv), (c)-(ii), (d)-(i)
(2) (a)-(iv), (b)-(i), (c)-(ii), (d)-(iii)
(3) (a)-(ii), (b)-(i), (c)-(iv), (d)-(iii)
(4) (a)-(iii), (b)-(iv), (c)-(i), (d)-(ii)

**7. 'उत्क्रांती' या शब्दासाठी अचूक शब्दसमूह कोणता? योग्य पर्याय निवडा.**
(1) कोणत्याही क्षेत्रात एकदम होणारा इष्ट बदल.
(2) कोणत्याही क्षेत्रात वेळोवेळी क्रांती होऊन इष्ट बदल होणे.
(3) कोणत्याही क्षेत्रात हळूहळू होणारा इष्ट बदल.
(4) कोणत्याही क्षेत्रात इष्ट बदल होण्याची स्थिती.

**8. विधानात अधोरेखित केलेल्या शब्दाचा प्रकार ओळखा.**
**विधान : 'माझी कन्या परदेशी गेली.'**
(1) तत्सम शब्द (2) तद्भव शब्द
(3) देशी शब्द (4) यापैकी नाही

**9. 'चौकीदार' हा शब्द कोणत्या परकीय भाषेतील आहे?**
(1) उर्दू (2) फारशी
(3) पोर्तुगीज (4) ग्रीक

**10. 'जगी सर्व सुखी असा कोण आहे'? या प्रश्नार्थक वाक्याचा प्रकार ओळखा.**
(1) नकारार्थी (2) होकारार्थी
(3) विधानार्थी (4) उद्गारवाचक

**11. 'आंधळ्याला भिक्षा वाढा बाई। तुमचा बोलबाला होईल' या वाक्यातील वाक्प्रचाराचा योग्य अर्थ पुढीलपैकी कोणता?**
(1) भुकेल्याला अन्न देणे
(2) आंधळ्याला मदत करणे
(3) चांगली कृती करणे
(4) उत्कर्ष होणे

**12. जो आपले काम करीत राहतो, तो मनुष्य देवाला प्रिय होतो. या वाक्यातील कर्म, कर्मविस्तार व विधेयपूरक हे घटक कोणते?**
(अ) मनुष्य-जो-देवाला
(ब) जो-आपले-राहतो-प्रिय
(क) काम-आपले-देवाला प्रिय
(ड) काम करीत-मनुष्य-देवाला
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (अ) व (क) अचूक आहे.

(2) फक्त (क) पर्याय अचूक आहे.
(3) फक्त (अ) व (ब) अचूक आहे.
(4) फक्त (ड) पर्याय अचूक आहे.

13. **'धनाची करी माया उडत्या पाखराची छाया' या म्हणीचा अर्थ ओळखा.**
(अ) खूप पैसा मिळवला की पुढे सुख मिळते.
(ब) खूप श्रीमंत असतात ते पक्षी पाळतात.
(क) आजची श्रीमंती उदया असेलच असे नाही.
(ड) स्वार्थी माणसे मोडून पडतात.
**पर्यायी उत्तरे :**
(1) (अ) व (क) बरोबर (2) (ब) व (ड) बरोबर
(3) फक्त (अ) बरोबर (4) फक्त (क) बरोबर

14. **अमेरिकेत राहणाऱ्या मुलाने साताराच्या शेतजमिनीवर रिकाम्या जागी अचूक वाक्प्रचार योजून योग्य वाक्य कसे होईल?**
(अ) अमेरिकेत राहणाऱ्या मुलाने साताराच्या शेतजमिनीवर बेलपत्र ठेवले आहे.
(ब) अमेरिकेत राहणाऱ्या मुलाने साताराच्या शेतजमिनीवर पाणी सोडले आहे.
(क) अमेरिकेत राहणाऱ्या मुलाने साताराच्या शेतजमिनीवर तुळशीपत्र ठेवले आहे.
(ड) अमेरिकेत राहणाऱ्या मुलाने साताराच्या शेतजमिनीकडे डोळेझाक केली आहे.
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (अ) व (ब) अचूक आहे.
(2) फक्त (ब) पर्याय अचूक आहे.
(3) फक्त (क) व (ब) अचूक आहे.
(4) फक्त (अ) व (ड) अचूक आहे.

15. **'जाणारा काळ पुढेच जात राहतो,' हे विधान कोणत्या विशेषण प्रकारातील आहे?**
(अ) नामसाधित विशेषणे (ब) सर्वनामसाधित विशेषणे
(क) धातुसाधित विशेषणे (ड) अव्ययसाधित विशेषणे
**पर्यायी उत्तरे :**
(1) (अ) फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(2) (ब) फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(3) (क) फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(4) (ड) फक्त बरोबर बाकी सर्व चूक

16. **पुढीलपैकी कोणते शब्द विविध लिंगात आढळतात?**
(1) जोडा, कवी (2) पोर, बाग
(3) देव, हत्ती (4) बोकड, आकाश

17. **(अ) झाडांचा रंग हिरवा आहे तो मला फार आवडतो.**
**(ब) कोकिळा गोड गाते, ते मला आवडते.**
**वरील वाक्यातील अधोरेखित सर्वनामे अनुक्रमे कोणासंबंधी आली आहेत?**
(1) नामासंबंधी (2) नाम व क्रियापद
(3) विशेषण व क्रियापद (4) फक्त क्रियापद

18. **मी, तू, तो, हा इत्यादी कोणती सर्वनामे आहेत?**
(अ) पुरुषवाचक सर्वनाम (ब) प्रश्नार्थक सर्वनाम
(क) संबंधी सर्वनाम (ड) आत्मवाचक सर्वनाम
**पर्यायी उत्तरे :**
(1) (अ) फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(2) (ब) फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(3) (क) फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(4) (ड) फक्त बरोबर बाकी सर्व चूक

19. **शुद्धलेखनाच्या नियमांनुसार शुद्ध शब्दांचे गट ओळखा.**
(अ) किर्तिवान, किचकिचित, किडूकमिडूक
(ब) अश्लीलता, अस्मानीसुलतानी, आत्मीयता
(क) कीर्तिवान, किचकिचीत, किडूकमिडूक
(ड) अभ्राच्छादित, आंबटचींबट, आकास्मिक
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (अ) व (क) बरोबर
(3) फक्त (ब) व (क) बरोबर
(2) फक्त (अ) व (ब) बरोबर
(4) फक्त (क) व (ड) बरोबर

20. **खालील विधानातून विध्यर्थी वाक्य ओळखा.**
(अ) तू कोल्हापूरला केंव्हा जाणार आहेस.
(ब) माझे आजोबा आज गावी गेले.
(क) तिची मुलगी मुळीच अभ्यास करत नाही.
(ड) विद्यार्थ्यांनी शिक्षकांची आज्ञा पाळावी.
**पर्यायी उत्तरे :**
(1) (अ) व (ब) बरोबर
(3) (क) बरोबर
(2) (अ), (ब), (क) बरोबर
(4) (ड) बरोबर

21. **'आकाशात जेव्हा ढग जमतात तेव्हा मोर नाचतो' या मिश्रवाक्यातील 'जेव्हा' या उभयान्वयी अव्ययाचा प्रकार ओळखा.**
(1) समुच्चयबोधक (2) गौणत्वसूचक
(3) विकल्पबोधक (4) प्रधानत्वसूचक

22. **खालीलपैकी कोणती व्यंजने उष्म व्यंजने मानली जातात?**
(अ) ज्ञ, क्ष (ब) स, श, ष, ह
(क) च, छ, झ, स (ड) ज, झ, छ, क्ष

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) बरोबर (2) (ब) व (ड) बरोबर
(3) फक्त (ब) बरोबर (4) फक्त (ड) बरोबर

**23. पुढील वाक्प्रचारातील चुकीच्या जोड्या ओळखा.**

(अ) छाती फाटणे – दुःखाने मन अत्यंत व्यथित होणे
(ब) घरावर गवत उगवणे – घराला वैभव प्राप्त होणे
(क) मागमूस नसणे – ठावठिकाणा नसणे
(ड) रजाचा गज करणे – एखादयाचे काम बिघडवून टाकणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (क) बरोबर
(2) (अ) व (ब) बरोबर
(3) (अ) व (ड) बरोबर
(4) (अ), (ब), (क) बरोबर

**24. अनेकार्थी शब्दांच्या जोड्या जुळवा.**

| | |
|---|---|
| (a) अनुरक्त | (i) पक्व, वाकलेले वृद्ध |
| (b) परिणत | (ii) व्यापार, प्रतिज्ञा, वेद |
| (c) अक्षत | (iii) निष्ठावंत, रंगविलेला, आसक्त |
| (d) निगम | (iv) दुःखरहित, सुरक्षित, संबंध |

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a)-(iii), (b)-(iv), (c)-(i), (d)-(ii)
(2) (a)-(iii), (b)-(i), (c)-(iv), (d)-(ii)
(3) (a)-(iv), (b)-(i), (c)-(ii), (d)-(iii)
(4) (a)-(ii), (b)-(i), (c)-(iv), (d)-(iii)

**25. दोन वा अधिक पदे वा शब्द जेव्हा एकमेकांत मिसळून जातात किंवा ते परस्परांना साधले जातात अथवा त्यांचा संयोग घडतो, त्या संयोगाला काय म्हणतात?**

(अ) जोडणी (ब) संयोग
(क) संधी (ड) वाव

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(2) (ब) फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(3) (क) फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(4) (ड) फक्त बरोबर बाकी सर्व चूक

**26. खालीलपैकी कोणत्या गटातील शब्दांची रूपे अनेकवचनी होताना बदलत नाहीत?**

(अ) पुस्तक, फळा, भाकरी, इमारत
(ब) वासरू, आसू, जळू, गाणे
(क) काका, शाळा, उंदीर, देश
(ड) गुरुजी, कवी, पाणी, पाऊस

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (क) बरोबर (2) (अ) व (ड) बरोबर
(3) (ब) व (क) बरोबर (4) (क) व (ड) बरोबर

**27. योग्य विधाने ओळखा.**

(अ) प्रयोजक व शक्य क्रियापदे यांची रूपे जवळजवळ सारखीच असतात.
(ब) प्रयोजक व शक्य क्रियापदे नेहमीच सकर्मक असतात.
(क) 'आईला आता घरकाम करवते.' या वाक्यात शक्य क्रियापद आले आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब) बरोबर (2) (अ) व (क) बरोबर
(3) फक्त (क) बरोबर (4) सर्व बरोबर

**28. 'गाजरपारखी' या शब्दाचा ध्वन्यर्थ ओळखा.**

(1) उत्तम पारख असलेला
(2) चांगल्याची पारख नसलेला
(3) गाजराचा व्यापारी
(4) भाजीचा यशस्वी व्यापारी

**29. मराठीत कोणत्या प्रत्ययांना चरमप्रत्यय म्हणतात?**

(अ) विभक्ती प्रत्यय (ब) तद्धित प्रत्यय
(क) पूर्वप्रत्यय (ड) आख्यात प्रत्यय

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब) बरोबर
(2) (अ) व (क) बरोबर
(3) (अ) व (ड) बरोबर
(4) (अ), (ब), (ड) बरोबर

**30. पुढे येणारी गोष्ट मागे सांगितलेल्या गोष्टींचे उदाहरण, यादी, सारांश, कोष्टक किंवा तत्सम काहीतरी आहे असे दाखविण्यासाठी वापरले जाणारे विरामचिन्ह कोणते?**

(1) लोपचिन्ह (2) अर्धविराम
(3) स्वल्पविराम (4) अपूर्णविराम

**31. आनंद, दुःख, आश्चर्य, प्रशंसा, तिरस्कार अशा मनातील विविध भावना व्यक्त करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या शब्दानंतर कोणते विरामचिन्ह येते?**

(1) पूर्णविराम (2) स्वल्पविराम
(3) उद्‌गारचिन्ह (4) प्रश्नचिन्ह

**32. 'तोंडातोंडी चालत आलेली गोष्ट' या शब्दसमूहासाठी योग्य शब्द कोणता?**

(1) इसापनीती (2) भाकडकथा
(3) हरिकथा (4) दंतकथा

**33. (अ) मला अजीर्ण झाले आहे.**
**(ब) मी खाणार नाही.**
**या वाक्यांचे मिश्र वाक्य ओळखा.**

Unique academy

**पर्यायी उत्तरे :**

(1) मला अजीर्ण झाल्यामुळे मी खाणार नाही.

(2) मला अजीर्ण झाले आहे म्हणून मी खाणार नाही.

(3) मी खाणार नाही कारण मला अजीर्ण झाले आहे.

(4) मला अजीर्ण झाले आहे तरी मी खाणार नाही.

**34. व्यंजनसंधीने तयार झालेल्या शब्दांचा गट ओळखा.**

(अ) ग्रामोद्योग, कलोपासक, वनौषधी

(ब) निस्तेज, बहिष्कार, भास्कर

(क) चंद्रोदय, लंबोदर, गंगोदक

(ड) सुषमा, अनुष्ठान, उद्धरण

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ड) बरोबर (2) (ब) व (क) बरोबर

(3) फक्त (अ) बरोबर (4) फक्त (ड) बरोबर

**35. सप्तमी या विभक्तीचा अर्थ काय?**

(1) स्वामित्व संबंध (2) अपादान

(3) अधिकरण (4) करणकारक

**36. सर्वनामाप्रमाणे दिसणारा शब्द नामाप्रमाणे येऊन त्याने नामाची वस्तू कशी आहे असे दाखवले तर त्या शब्दास ....... म्हणतात.**

(1) सर्वनाम (2) नाम

(3) सर्वनामोत्पन्न सर्वनाम (4) सार्वनामिक विशेषण

**37. जी अव्यये नामे आणि नामाप्रमाणे योजलेले शब्द यांच्यापुढे येऊन त्यांचा वाक्यातील इतर शब्दांशी संबंध दाखवतात त्यांना ....... म्हणतात.**

(1) विशेषण (2) क्रियाविशेषण अव्यय

(3) शब्दयोगी अव्यय (4) उभयान्वयी अव्यय

**38. 'शेतातील पीक चांगले आल्यामुळे रंगरावांनी कर्जापोटी काही रक्कम जमा केली, आपला कर्जबोजा थोडासा हलका झाल्याने ते आनंदित झाले' या वाक्यातील अधोरेखित शब्दातील आशय सूचित करणारा योग्य 'वाक्प्रचार' ओळखा.**

(1) डोक्यावरून पाणी फिरणे

(2) डोकीवरचे खांद्यावर येणे

(3) डोके हलके होणे

(4) कर्ज मुक्त होणे

**39. योग्य जोड्या जुळवा :**

| | |
|---|---|
| (a) इंग्रजी शब्द | (i) दुकान, सही, जंगल |
| (b) पोर्तुगीज शब्द | (ii) ताकद, कंदील, फरक |
| (c) अरबी शब्द | (iii) तिकिट, बटन, मोटार |
| (d) फारशी शब्द | (iv) लिलाव, खण, इस्त्री |

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a)-(ii), (b)-(iv), (c)-(i), (d)-(i)

(2) (a)-(iii), (b)-(i), (c)-(iv), (d)-(ii)

(3) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(i), (d)-(i)

(4) (a)-(ii), (b)-(iv), (c)-(iii), (d)-(i)

**40. 'रामभाऊंचे पैसे गोविंदरावाला आपले म्हणून देणे आणि गोविंदरावांपुढे आपली फुशारकी मिरवणे' हा आशय सूचित करणारी पुढीलपैकी योग्य म्हण कोणती?**

(1) हाती धरला रोडका आणि डोई धरला बोडका

(2) शेरास सव्वा शेर

(3) पैसा दक्षिणा आणि लक्ष प्रदक्षिणा

(4) हलवायाच्या घरावर तुळशीपत्र

**41. आम्हां मुलांना कोण विचारतो? विशेषणाचा प्रकार ओळखा.**

(1) प्रश्नार्थक विशेषण (2) अनिश्चित विशेषण

(3) सार्वनामिक विशेषण (4) नामसाधित विशेषण

**42. काय बोलायचे असेल ते बोल, या विधानातील 'काय' हे शब्दरूप कोणत्या सर्वनाम प्रकारातील आहे?**

(अ) आत्मवाचक सर्वनाम (ब) प्रश्नार्थक सर्वनाम

(क) संबंधी सर्वनाम (ड) अनिश्चितार्थक सर्वनाम

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) फक्त बरोबर बाकी सर्व चूक

(2) (ब) फक्त बरोबर बाकी सर्व चूक

(3) (क) फक्त बरोबर बाकी सर्व चूक

(4) (ड) फक्त बरोबर बाकी सर्व चूक

**43. वास्तव अथवा मानस सृष्टीतील इंद्रियगम्य आणि मनोरम्य वस्तू ज्या शब्दांनी बोधित होतात त्या शब्दांना ....... असे म्हणतात.**

(1) भाववाचक नाम (2) नाम

(3) सर्वनाम (4) विशेषनाम

**44. 'कुणी काही म्हणा, कुणी काही म्हणा'. हा सर्वनामाचा कोणता प्रकार आहे. अचूक पर्याय निवडा.**

(1) संबंधी सर्वनाम (2) दर्शक सर्वनाम

(3) पुरुषवाचक सर्वनाम (4) अनिश्चित सर्वनाम

**45. क्रियाविशेषणाचे उपप्रकार व त्यांची उदाहरणे यांच्या योग्य जोड्या जुळवा.**

| | |
|---|---|
| (a) स्थलवाचक | (i) तेव्हा, हमेशा, रातोरात |
| (b) कालवाचक | (ii) करकर, पट्दिशी, उगीच |
| (c) संख्यावाचक | (iii) समोरून, तिकडून, जवळ |
| (d) रीतिवाचक | (iv) अत्यंत, बेताचा, चौपट |

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a)-(iii), (b)-(i), (c)-(iv), (d)-(ii)

(2) (a)-(iii), (b)-(iv), (c)-(i), (d)-(ii)
(3) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(i)
(4) (a)-(ii), (b)-(i), (c)-(ii), (d)-(iv)

**पुढील उतारा वाचून प्रश्न क्रमांक 46 ते 50 या प्रश्नांची उत्तरे दया.**

आधुनिक जगातील सत्तेच्या वर्चस्वाची उतरंड हा कळीचा मुद्दा बनते. तंत्रज्ञानाचे श्रेष्ठत्व, आधुनिकता वर्चस्व गाजवते. शत्रुला अत्याधुनिक तंत्रज्ञानापासून वंचित ठेवायचे, अन् मग आपल्या अटी एकतर्फी लादायच्या. दोन हजार वर्षांपूर्वी चिनी तत्त्वज्ञानी 'सून त्झू' याने युद्धशास्त्राचा एक महत्त्वाचा नियम सांगितला आहे. युद्धामध्ये शत्रुच्या मानवी शक्तीचे खच्चीकरण करण्यापेक्षा शत्रुसैन्याचे मनोधैर्य खच्ची करणे जयासाठी अधिक महत्त्वाचे आहे. मनाने हरलेले सैन्य सहज पराभूत होऊ शकते. हे सांगताना त्याने जणू विसाव्या शतकातील तंत्रज्ञानाच्या वर्चस्वाला डोळ्यांसमोर ठेवले असावे. आखाती युद्धात वापरली गेलेली इलेक्ट्रॉनिक शस्त्रे अन् क्षेपणास्त्रे यांचा एकत्रितपणे केला गेलेला मुबलक वापर पाहणे हे युद्धशास्त्राच्या माहितगारांना डोळ्यांना मेजवानी मिळाल्यासारखे होते. जणू एकविसाव्या शतकात युद्ध झाले, तर जगाच्या रंगमंचावर काय दिसेल याची झलक पाहायला मिळाली. क्षेपणास्त्रे, इलेक्ट्रॉनिक शस्त्रे, माहिती-तंत्रज्ञान हे जणू त्यावर प्रमुख भूमिका निभावणार आहेत.

आपल्या देशात 'तंत्रज्ञान' म्हणजे अजूनही काळा धूर ओकणाऱ्या उंच चिमण्या आणि कर्कश आवाज करणारी अवजड यंत्रे हेच चित्र बहुसंख्य लोकांच्या डोळ्यांसमोर उभे राहते. हे विपर्यस्त चित्र आहे. मध्ययुगामध्ये घोड्याचा लगाम शोधला गेला अन् शेतीशास्त्रात आमूलाग्र बदल झाला. त्यानंतर कित्येक शतकांनी बेसामरची धातू वितळवणारी भट्टी बनली अन् मानवाने धातूला हवा तो आकार देऊन फार मोठी तांत्रिक झेप घेतली. तंत्रज्ञानामध्ये अशी काही संशोधने किंवा यंत्रे बनतात की त्यांचा प्रत्यक्ष व्यवहारात उपयोग होतोच असे नाही; पण ज्ञान म्हणून ते मानवाला समृद्ध करत राहते. उदाहरण द्यायचे झाले, तर रसायनशास्त्रातील प्रक्रिया, मासे प्रजनन करतात ते शास्त्र, गवत उपटण्याचे, रोगी तपासायचे, वा इतिहास शिकवायचे, युद्धे करायचे वा थांबवायचे अशी अनेक देता येतील.

आज अधिकांश तंत्रज्ञान हे फिरत्या पट्ट्यापासून वा उघड्या भट्टीपासून दूर असते. इलेक्ट्रॉनिक्स, अवकाश संशोधन अशा नव्या क्षेत्रांत तर शांतता आणि स्वच्छता प्रथम क्रमांकाची गरज असते. फिरत्या पट्ट्यापाशी उभी असलेली लहानसहान कामे करणारी माणसांची फौज हे चित्र कालबाह्य झाले आहे. नव्या तंत्रज्ञानाला सोबत नेण्याआधी जनमानसातली ही तंत्रज्ञानाची कालबाह्य प्रतीके आधी बदलायला हवीत. तंत्रज्ञान हे तंत्रज्ञान, पचवूनच वाढते, अधिक पुढे जाते; स्वतःचा उद्धार स्वतःच करू शकते. एका अर्थाने तंत्रज्ञानातील प्रगती ही तीन टप्प्यांमध्ये एकमेकांत गुंतलेली वर्तुळाकार साखळी असते. पहिली निर्मिती अवस्था, ज्यामध्ये एखाद्या कल्पनेचा आराखडा असतो. मग तो आराखडा सत्यात उतरवला जातो आणि प्रत्यक्ष व्यवहारात त्याचा वापर केला जातो. मग ते समाजात मिळून मिसळून जाते अन् जीवनाचा एक भाग बनते. इथे हे वर्तुळ पूर्ण होते. असे हे तंत्रज्ञान समाजात मुरले, की त्याची सवय होते आणि अधिक परिपूर्णतेकडे जाण्यासाठी नव्या कल्पना सुचतात. असे हे एकातून उद्‌भवणारे दुसरे वर्तुळ आहे. विकसित देशात या वर्तुळातील प्रत्येक टप्प्यातील वेळेचे अंतर कमी कमी होते आहे. आपल्या देशात आपण नुकते वर्तुळ पूर्ण व्हायच्या पायरीवर पोचलेलो आहोत.

**46. प्रस्तुत उताऱ्यातील विवेचनातून कोणत्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत?**
(1) तंत्रज्ञानातून शांतता व स्वच्छता निर्माण करणे
(2) तंत्रज्ञान समाजात रूजले पाहिजे
(3) तंत्रज्ञानातून नवनव्या कल्पना सूचल्या पाहिजेत
(4) तंत्रज्ञानाकडे नवदृष्टीने पाहण्याची गरज

**47. तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा आरंभबिंदू कोणता?**
(1) इलेक्ट्रॉनिक शस्त्रे बनविणे
(2) एखादी कल्पना सूचणे
(3) तंत्रज्ञान समाजाच्या पचनी पडणे
(4) कल्पना सत्यात उतरणे

**48. युद्ध जिंकण्यासाठी महत्वाचा डावपेच कोणता असू शकतो?**
(1) शत्रूसैन्याचा संहार करणे
(2) शत्रूसैन्याच्या मानसिकतेवर आघात करणे
(3) शत्रूसैन्यावर क्षेपणास्त्र डागणे
(4) शत्रूसैन्याशी करार करणे

**49. प्रस्तुत उताऱ्यातील चिंतनाचे केंद्र कोणते?**
(1) इतिहास (2) अणूविज्ञान
(3) अवजड यंत्रसामुग्री (4) इलेक्ट्रॉनिक क्षेत्र

**50. तंत्रज्ञानाच्या परिपूर्ण रूपाचा आविष्कार कोणता?**
(1) तंत्रज्ञानाचा व्यवहारात वापर होणे
(3) तंत्रज्ञानातून नव कल्पना सुचणे
(2) तंत्रज्ञान अंगवळणी पडणे
(4) तंत्रज्ञान जीवनाचा भाग बनणे

**51. 'You <u>ought to</u> be considerate towards your patients'.**
**The model auxiliary underlined in the sentence above conveys**
(a) necessity (b) moral duty
(c) obligation (d) mild compulsion
**Answer options :**
(1) (d) only (2) (c) only
(3) (b) only (4) (a) only

**52. Read the following sentence carefully and answer the given question :**
**"The Captain and Coach of the hockey team attended the press conference."**
**What is the status of captain and coach in the sentence ?**
(1) Captain and Coach are two different persons
(2) Captain and Coach is the same person
(3) Captain and Coach are enemies of each other
(4) Captain and Coach are friends

**53. He said to me, Help him in settling the accounts. Which of the following sentences correctly changes the sentence above into an Indirect speech?**
(a) He told me to help him in settling the accounts.
(b) He persuaded me to help him in settling the accounts.
(c) He requested me to help him in settling the accounts.
(d) He urged me to help him to settle the accounts.
**Answer options :**
(1) (d) only (2) (c) only
(3) (a) only (4) (b) only

**54. Grishma spoke with white heat.**
**Select the correct meaning of the underlined.**
(1) Natural shrewdness (2) Intense passion
(3) Plain voice (4) Cunning passion

**55. The word 'avaricious' is synonymous with**
(a) applicable (b) omnipresent
(c) omniscient (d) greedy
**Answer options :**
(1) (b) only (2) (c) only
(3) (d) only (4) (a) only

**56. 'One who lives for pleasure'.**
**Which of the following words matches the meaning above?**
(a) Fanatic (b) Happy-go-lucky
(c) Hedonist (d) Misogynist
**Answer options :**
(1) (a) only (2) (c) only
(3) Both (a) and (b) (4) (d) only

**57. 'Stop talking'.**
**Which of the following sentences changes the above imperative sentence into an interrogative sentence ?**
(a) Did you stop talking ?
(b) Would you stop talking ?
(c) Will you stop talking ?
(d) Shall you stop talking ?
**Answer options :**
(1) (d) only (2) (b) only
(3) (c) only (4) (a) only

**58. Use proper punctuation in the blank space of the following sentence :**
**I have no money ....... therefore I cannot afford a servant.**
(1) (comma) (2) (colon)
(3) (semicolon) (4) (hyphen)

**59. The underlined word in the given sentence is:**
**"<u>Notwithstanding</u> the late hour, she attended the meeting as scheduled."**
(1) An adverb (2) Definite article
(3) Preposition (4) Auxiliary verb

**60. Read the sentence carefully and identify what kind of conjunction the underlined word is ;**
**He is saving some amount each month <u>so that</u> he can pay his college fees.**
(1) Compound conjunction
(2) Correlative conjunction
(3) Coordinating conjunction
(4) Subordinating conjunction

**61. The military <u>is going to</u> lay a trap to arrest the terrorists'.**
**The underlined form in the sentence above is used to convey ........**
(a) intention to perform a certain action in the near future
(b) planned action
(c) action in remote future
(d) a great probability
**Answer options :**
(1) (d) only (2) (b) only
(3) (a) only (4) both (c) and (d)

**62. Choose the best meaning of the underlined word.**
**She <u>pirouetted</u> across the stage.**
(1) Ran fast
(2) Took a fast turn or spin
(3) Spoke loudly
(4) Looked anxiously

**63. ........ what you can afford.**
**Complete the sentence choosing the correct alternative.**
(1) Work out (2) Work on
(3) Work with (4) Work about

**64. Match the following homophones - 'Vein', 'Vain' and 'Vane' with their correct meaning :**
(a) Vein (i) Weathercock
(b) Vain (ii) Blood artery

The UNIQUE academy

(c) Vane (iii) Conceited, proud

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) |
|---|---|---|---|
| (1) | (iii) | (i) | (ii) |
| (2) | (ii) | (iii) | (i) |
| (3) | (ii) | (i) | (iii) |
| (4) | (i) | (ii) | (iii) |

**65. Find out the exact meaning of the underlined idiom in the given sentence :**
**"Most of her friends avoid talking to her as she is constantly blowing her own trumpet."**

(1) To forget past enmity
(2) To put in all possible efforts
(3) To be very busy
(4) To boast about self

**66. Read the following sentence.**
**Despite her age, she walks steadily.**
**The underlined words walks steadily are examples of :**

(1) Noun phrase
(2) Adjective phrase
(3) Adverbial phrase
(4) None of the above

**67. Her bank fell down from her purse.**
**The underlined word in the sentence above means**

(a) balance (b) financial institution
(c) side of a river (d) row of keys

**Answer options :**
(1) (d) only (2) (c) only
(3) (b) only (4) (a) only

**68. 'This is the place where the murder was committed'.**
**The clause underlined in the sentence above is a/an -**

(a) Adverbial clause (b) Noun clause
(c) Adjective clause (d) Prepositional clause

**Answer options :**
(1) (c) only (2) (d) only
(3) (b) only (4) (a) only

**69. Choose the word/s wrongly spelt.**

(a) LACKADAIICAL
(b) LASCIVIOUS
(c) LIBIDINEOUS

**Answer options :**
(1) (c) only (2) (a) and (c) only
(3) (b) and (c) only (4) (a), (b) and (c)

**70. Choose the incorrect sentence :**

(a) He hurt himself.
(b) James and myself went together.
(c) Behave yourself.
(d) She did it all by herself.

**Answer options :**
(1) (d) only (2) (a) only
(3) (b) only (4) (c) only

**71. Choose the correct sentence :**

(a) The ship was wrecked and every man, woman and child was drowned.
(b) The ship was wrecked and every man, woman and child were drowned.
(c) The ship was wrecked and every man, woman and child are drowned.
(d) The ship was wrecked and every man, woman and child had drowned.

**Answer options :**
(1) both (a) and (d) (2) (b) only
(3) (c) only (4) (a) only

**72. ....... is the correct compound noun in the plural form.**

(a) Brothers-in-law (b) Brother-in-laws
(c) Brothers-ins-laws (d) Brethren-in-law

**Answer options :**
(1) (b) only (2) (c) only
(3) (d) only (4) (a) only

**73. Read the following sentence.**
**"Hearing the knock, she opened the door."**
**What kind of synthesizer is the underlined word in the sentence? It is ........**

(1) a gerund (2) a participle
(3) an adverbial clause (4) a noun clause

**74. Read the sentences carefully and choose a correct answer from the options given below :**

(a) Milk and honey are a nourishing food.
(b) Milk and honey is a nourishing food.

**Answer options :**
(1) Only (a) is correct
(2) Only (b) is correct
(3) Both (a) and (b) are correct
(4) Both (a) and (b) are incorrect

**75. The judge ordered that the accused be set free'.**
**The sentence above expresses ....... mood.**

(a) Subjunctive (b) Imperative
(c) Indicative (d) Expressive

**Answer options :**
(1) (d) only (2) (c) only
(3) (a) only (4) (b) only

**Read the passage given below carefully and answer**

**question numbers 76 to 80 based on it.**

Until he was ten, young Alexander Fleming attended the nearby London Moor school. He was then transferred to Darvel school which he attended with his brothers. Alexander learned a good deal about nature during that four-mile downhill hike to school and the four-mile uphill return trip. He was a quick student and at twelve, the age limit prescribed for Darvel school, he was sent to Kilmarnock Academy. Two years later he joined his brothers John and Robert at the home of his elder brother Thomas, who was to become a successful occultist in London. However, the economic success of the family was yet to be and Alexander was forced to leave school for economic reasons. When he was sixteen he obtained a job in a shipping company. Good fortune, however was on his side and on the side of humanity. In 1901, he received a share in a legacy which made it possible for him to return to school. He decided to study medicine.

**76. The word 'legacy in the context means**

(1) Lottery (2) Goodwill money
(3) Inheritance (4) Legal payment

**77. Alexander trekked ....... miles everyday to attend Darvel school**

(1) Four (2) Eight
(3) Twelve (4) Unknown

**78. He was a quick student - This means that Alexander**

(1) reached school before his brothers
(2) reached the school-leaving age
(3) was a lively student too soon
(4) was a fast learner

**79. ....... and at twelve, the age limit prescribed for Darvel school .......**
**This in the context means that children were**

(1) Not admitted to the school before they were twelve
(2) Admitted to the school at the age of twelve
(3) Allowed to remain in the school only upto the age of twelve
(4) Admitted to the school anytime after the age of twelve

**80. Alexander became rich .......**

(1) by working in a shipping company
(2) when his brother became a successful occultist
(3) because he studied medicine
(4) by receiving share in a legacy

**81. टोकियो 2020 ऑलिंपिक स्पर्धांमध्ये पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेत सुवर्णपदक मिळवणाऱ्या नीरज चोप्रा यांचे 'लॉरिअस वर्ल्ड ब्रेक शु ऑफ दी इयर अवॉर्ड 2022' साठी नामांकन झाले होते. पण प्रत्यक्षात ब्रिटिश टेनिस क्षेत्रात खळबळ माजवणाऱ्या ....... यांना तो पुरस्कार मिळाला.**

(1) एमा राडूकानु (2) डॅन इव्हान्स
(3) अँडी मुरे (4) व्हर्जीनिया वेड

➡ **Neeraj Chopra, who bagged the men's javelin throw gold at Tokyo 2020 Olympics, was nominated for the 'Laureus World Break Through of The Year Award for 2022'. But, actually the award went to British Tennis sensation**

(1) Emma Raducanu (2) Dan Evans
(3) Andy Murray (4) Virginia Wade

**82. जनरल मनोज पांडे यांची देशाचे 29 वे लष्करप्रमुख म्हणून नुकतीच नियुक्ती झाली. जनरल पांडे हे लष्कराचे नेतृत्व करणारे ....... शाखेतील पहिले अधिकारी आहेत.**

(1) सायबर शाखा
(2) संकेतक (सिग्नल) शाखा
(3) सैन्य गुप्तचर शाखा
(4) अभियांत्रिकी शाखा

➡ **General Manoj Pande has been recently appointed as the 29th Chief of the Army Staff. He is the first officer from the ....... to become army chief.**

(1) Cyber Corps
(2) Signal Corps
(3) Military Intelligence Corps
(4) Corps of Engineers

**83. 2022 च्या ऑस्कर पुरस्कार सोहळ्यात सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा सन्मान खालीलपैकी कोणास प्राप्त झाला आहे?**

(1) पेनेलोप क्रूझ (2) निकोल किडमन
(3) जेसिका चेस्टन (4) क्रिस्टन स्ट्युअर्ट

➡ **Who among the following has been awarded as the best female actress at the Oscars 2022 ?**

(1) Penelope Cruz (2) Nicole Kidman
(3) Jessica Chastain (4) Kristen Stewart

**84. भारतातील खालीलपैकी कोणता विमानतळ हा नागरी एन्क्लेव्ह आहे?**

(नागरी एन्क्लेव्ह म्हणजे एखाद्या लष्करी विमानतळावरील नागरी उड्डाणास आखून दिलेली जागा)

(1) चेन्नई आंतरराष्ट्रीय विमानतळ
(2) जयपूर आंतरराष्ट्रीय विमानतळ
(3) गोवा आंतरराष्ट्रीय विमानतळ
(4) कोझीकोडे विमानतळ, कालिकत

➡ **Which of the following airports in India is a**

**civil enclave ?**
(A civil enclave is an area of military airbase allotted to the usage of civil aviation)
(1) Chennai International Airport
(2) Jaipur International Airport
(3) Goa International Airport
(4) Kozhikode Airport, Calicut

85. **2020 व 2021 च्या फिफाच्या 'सर्वोत्तम फुटबॉलपटू' पुरस्काराचा मानकरी रॉबर्ट लेवांडोवस्की खालीलपैकी कोणत्या संघाचे प्रतिनिधित्व करतो?**
(1) लिव्हरपूल (2) बायर्न म्युनिक
(3) बार्सिलोना (4) ज्युवेंटस्
➨ **Robert Lewandowski the Best FIFA 'Men's Player' for 2020 and 2021, represents which of the following team ?**
(1) Liverpool (2) Bayern Munich
(3) Barcelona (4) Juventus

86. **ख्यातनाम गायक व संगीतकार बप्पी लाहिरी यांचे नुकतेच ....... या आजारामुळे निधन झाले.**
(1) न्युमोनिआ
(2) कोरोना
(3) ऑब्स्ट्रक्टिव्ह स्लीप ॲप्निया
(4) प्रोग्रेसिव्ह सुप्रा न्युक्लियर पाल्सी
➨ **Wellknown singer and music composer Bappi Lahiri recently passed away, due to ........**
(1) Pneumonia
(2) Corona
(3) Obstructive sleep apnea
(4) Progressive supra nuclear palsy

87. **44 व्या ऑलिम्पियाड बुद्धिबळ स्पर्धेचे यजमानपद खालीलपैकी कोणता देश भूषविणार आहे?**
(1) रशिया (2) भारत
(3) नॉर्वे (4) इंग्लंड
➨ **Which of the following country will be hosting 44th Chess Olympiad ?**
(1) Russia (2) India
(3) Norway (4) England

88. **खालीलपैकी कोणत्या चित्रपटाला 2021 चा फिल्मफेअर 'उत्कृष्ट चित्रपट' पुरस्कार मिळाला?**
(1) अंग्रेजी मीडियम (2) थप्पड
(3) गुलाबो सिताबो (4) सर
➨ **Which of the following films won the 'Best Film' award in Filmfare awards 2021 ?**
(1) Angrezi Medium (2) Thappad
(3) Gulabo Sitabo (4) Sir

89. **2021 साली पुढीलपैकी कोणत्या राजकीय पक्षाने त्याचे शताब्दी वर्ष साजरे केले?**
(1) चीनचा साम्यवादी पक्ष
(2) भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस
(3) होमरूल पक्ष
(4) इंग्लंडचा मजूर पक्ष
➨ **Which of the following political parties celebrated its centenary in year 2021 ?**
(1) Communist Party of China
(2) Indian National Congress
(3) Home Rule Party
(4) Labour Party of England

90. **महाराष्ट्रातील सागरी किनाऱ्यावर पहिल्यांदा खालीलपैकी कोणत्या कासवांच्या प्रजातीच्या प्रजननाची नोंद नुकतीच करण्यात आली आहे?**
(1) ग्रीन सी टर्टल (2) ऑलिव्ह रिडले टर्टल
(3) केम्प रिडले सी टर्टल (4) लेदर बॅंक सी टर्टल
➨ **A nesting site of which of the following species of turtle has been recently found for the first time on the beaches of Maharashtra ?**
(1) Green sea turtle
(2) Olive ridley turtle
(3) Kemp ridley sea turtle
(4) Leather back sea turtle

91. **माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 कलम 26(3) नुसार समुचित शासन, आवश्यक असल्यास, पोटकलम (2) मध्ये निर्दिष्ट केलेली मार्गदर्शक तत्वे नियमित कालांतराने अद्ययावत करून प्रसिद्ध करील आणि विशेषतः व पोटकलम (2) च्या सर्वसाधारणतेला बाधा न येऊ देता या मार्गदर्शक तत्वांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश असेल :**
(a) या अधिनियमाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांच्या किंवा लादलेल्या कर्तव्यांच्या बाबतीतील कृती किंवा कृती करण्यात केलेली कसूर या संबंधातील कायद्यातील उपाययोजना, तसेच आयोगाकडे अपील दाखल करण्याची पद्धती.
(b) या अधिनियमाची उद्दिष्टे.
(c) माहिती मिळवण्यासाठी केलेल्या विनंतीच्या संबंधात द्यावयाच्या फी बाबतची नोटीस.
(d) या अधिनियमानुसार माहिती मिळविण्यासंबंधात करण्यात आलेले कोणतेही अतिरिक्त विनियम.

**अचूक पर्याय निवडा.**
(1) पर्याय (a), (b) आणि (c) योग्य आहेत
(2) पर्याय (b), (c) आणि (d) योग्य आहेत
(3) वरील सर्व पर्याय योग्य आहेत
(4) फक्त पर्याय (a) आणि (c) योग्य आहेत

➡ **As per section 26(3) of Right to Information Act, 2005 the appropriate Govt, shall if necessary, update and publish the guidelines referred to in sub-sec (2) at regular intervals which shall, in particular and without prejudice to the generality of sub-sec (2) include :**

(a) All remedies in law available regarding an act or failure to act in respect of a right or duty conferred or imposed by this act including the manner of filing an appeal to the Commission.
(b) The objects of this act.
(c) The notices regarding fees to be paid in relation to requests for access to an information.
(d) Any additional regulations.

**Choose the correct options :**

(1) Option (a), (b) and (c) are correct
(2) Option (b), (c) and (d) are correct
(3) All options are correct
(4) Only option (a) and (c) are correct

---

92. **खालीलपैकी कोणते/ती विधान/ने हे माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत माहिती मागण्याच्या अर्जाबद्दल खरे आहे/त?**

(a) अर्ज हा लिखित स्वरूपात किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून असावा.
(b) अर्जासोबत ठरवून दिलेली फी असावी/दारिद्र्य रेषेखालील अर्जदारास फी, शुल्क नाही.
(c) अर्जात माहिती मागण्याची कारणे दिलेली असावी.
(d) अर्जात अर्जदाराची संपर्क साधण्यापुरती वैयक्तिक माहिती दिलेली असावी.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (b) फक्त
(2) (c), (d) फक्त
(3) (a), (b), (d) फक्त
(4) (a), (b), (c) आणि (d)

➡ **Which of the following statement/s is/are true regarding application seeking information under Right to Information Act, 2005 ?**

(a) Application should be in writing or through electronic means.
(b) Application should be accompanied by prescribed fees/no fee and cost for applicant below poverty line.
(c) Application should mention reason for requesting the information.
(d) Application should mention personal details of applicant necessary for contacting him.

**Answer options :**

(1) (b) only
(2) (c), (d) only
(3) (a), (b), (d) only
(4) (a), (b), (c) and (d)

---

93. **महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 चे खालीलपैकी कोणते कलम 'आयोगाचे अधिकार आणि कार्ये' यांच्याशी संबंधित आहे?**

(1) कलम 2
(2) कलम 22
(3) कलम 21
(4) वरीलपैकी काहीही नाही

➡ **Which of the following section of Maharashtra Right to Public Service Act, 2015 relates with 'Power and Functions of Commission'?**

(1) Section 2
(2) Section 22
(3) Section 21
(4) None of the above

---

94. **माहिती अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 12(3) नुसार केंद्रीय माहिती आयोग गठीत करण्यासाठी मुख्य माहिती आयुक्ताची व माहिती आयुक्तांची नियुक्ती, राष्ट्रपती, पुढील व्यक्तींची मिळून बनलेल्या समितीच्या शिफारशीनुसार करील :**

(a) पंतप्रधान, जे या समितीचे अध्यक्ष असतील.
(b) लोकसभेतील विरोधीपक्ष नेता.
(c) पंतप्रधान यांनी नामनिर्देशित करावयाचा एक केंद्रीय कॅबीनेट मंत्री.
(d) राज्याचा मुख्यमंत्री.

**अचूक पर्याय निवडा :**

(1) पर्याय (a), (b) आणि (c) योग्य आहेत
(2) पर्याय (b), (c) आणि (d) योग्य आहेत
(3) सर्व पर्याय योग्य आहेत
(4) वरीलपैकी एकही नाही

➡ **For Constitution of Central Information Commission - Sec. 12(3) of RTI Act, 2005, the Chief Information Commissioner and Information Commissioners shall be appointed by the President on the recommendation of a committee consisting of:**

(a) The Prime Minister, who shall be the chair person of the Committee.
(b) The leader of opposition in the Lok Sabha.
(c) A Union Cabinet Minister to be nominated by the Prime Minister,
(d) The Chief Minister of a state.

**Choose the correct options :**

(1) Option (a), (b) and (c) are correct
(2) Option (b), (c) and (d) are correct
(3) All options are correct
(4) None of the above

The Unique academy

95. 'सार्वजनिक सेवा कालमर्यादेत पोहोचवण्याची संस्कृती विकसित करणे' हे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 या कायद्याच्या खालीलपैकी कोणत्या कलमाशी निगडीत आहे?

(1) कलम 24
(2) कलम 25
(3) कलम 17
(4) वरीलपैकी काहीही नाही

➨ **Developing a culture to deliver Public Services within stipulated time limit' deals with which of the following section of the Maharashtra Right to Public Services Act, 2015 ?**

(1) Section 24 (2) Section 25
(3) Section 17 (4) None of the above

---

96. **खालीलपैकी कोणते फाईल फॉरमॅट एस.एम.टी.पी. (सिंपल मेल ट्रान्सफर प्रोटोकॉल) द्वारे समर्थित आहे?**

(1) अमेरिकन स्टॅंडर्ड कोड ऑफ इन्फॉरमेशन इंटरचेंज (ASCII)
(2) रिच टेक्स्ट फॉरमॅट (RTF)
(3) संयुक्त (जॉईन्ट) फोटोग्राफीक एक्सपर्ट ग्रुप (JPEG)
(4) टॅग इमेज फाईल फॉरमॅट

➨ **(TIFF) Which of the following file format is supported by SMTP (Simple Mail Transfer Protocol) ?**

(1) American Standard Code of Information Interchange (ASCII)
(2) Rich Text Format (RTF) &
(3) Joint Photographic Expert Group (JPEG)
(4) Tagged Image File Format (TIFF)

---

97. **खालीलपैकी कोणते भारतातील पहिले न्युट्रल इंटरनेट एक्सचेंज आहे?**

(1) एन.आय.ई.ओ.आय.
(2) एन.आय.एक्स.आय.
(3) आय.एक्स.ओ.आय.
(4) आय.ई.आय.

➨ **Which of the following is Indies first neutral internet exchange ?**

(1) NIEOI (2) NIXI
(3) IXOI (4) IEI

98. **माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर करून म्हणजे इंटरनेट, यात एखाद्या व्यक्तीने किंवा गटाने, दूसऱ्या व्यक्तीस किंवा गटास त्रास देणे यास ........ असे म्हणतात.**

(1) सायबरस्टाकिंग (2) सायबरबूलींग
(3) सायबरचॅटींग (4) सायबरफ्रिकिंग

➨ **Use of information and communication technology, that is internet, by individual or group to harass another individual or group is called**

(1) Cyberstalking (2) Cyberbullying
(3) Cyberchatting (4) Cyberphreaking

---

99. **....... हे मोबाईल ॲप्लिकेशन सर्व भारतीय नागरीकांना पॅन इंडिया ई-गव्हर्नन्स सेवा वापरण्यासाठी एकच व्यासपीठ प्रदान करते.**

(1) आधार (AADHAR)
(2) उमंग (UMANG)
(3) डिजिलॉकर (Digilocker)
(4) दिक्षा (DIKSHA)

➨ **mobile application provides a single platform for all Indian citizens to use pan India e-governance services.**

(1) AADHAR (2) UMANG
(3) Digilocker (4) DIKSHA

---

100. **या पृथ्वीवरील प्रत्येक व्यक्तिला सर्व मानवी ज्ञानासाठी विनामूल्य प्रवेश दिलेले असा ऑनलाईन विश्वकोश म्हणजेच विकिपिडिया, या प्रकल्पाचे सह संस्थापक कोण?**

(1) जिमी वेल्स (2) जिमी कार्टर
(3) जिमी न्यूट्रॉन (4) जिमी किमेल

➨ **A world in which, every single person on the planet was given free access to the sum of all human knowledge, this idea is online encyclopedia called wikipedia, co founder of this project is**

(1) Jimmy Wales (2) Jimmy Carter
(3) Jimmy Neutron (4) Jimmy Kimmel

The Unique academy

## PSI-STI-ASO - मुख्य परीक्षा 2021 उत्तरे
## मराठी, इंग्रजी व सामान्य ज्ञान

| Ans | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 3 | 3 | 4 | 3 | 1 | 2 | 2 |
| 11 | 4 | 2 | 4 | 2 | 3 | 2 | 3 | 1 | 3 | 4 |
| 21 | 2 | 3 | # | 2 | 3 | 4 | 2 | 2 | 3 | 4 |
| 31 | 3 | 4 | 3 | 4 | 3 | 4 | 3 | 2 | 1 | 4 |
| 41 | 3 | 4 | 2 | 4 | 1 | 4 | 2 | 2 | 4 | 3 |
| 51 | 3 | 2 | 2 | 2 | 3 | 2 | 3 | 3 | 3 | 1 |
| 61 | 3 | 2 | # | 2 | 4 | 3 | 1 | 1 | 1 | 3 |
| 71 | 4 | 4 | 2 | 2 | 3 | 3 | 2 | 4 | 3 | 4 |
| 81 | 1 | 4 | 3 | 3 | 2 | 3 | 2 | 2 | 1 | 1 |
| 91 | 3 | 3 | 4 | 1 | 4 | 1 | 2 | # | 2 | 1 |

# या चिन्हाने दर्शविलेले प्रश्न रद्द करण्यात आलेले आहेत.